


दैनिक **जनसंचलन** निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : ३३७ वा | मंगळवार दि ०७ एप्रिल २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# बारामतीत काँग्रेसचा उमेदवार, राष्ट्रवादीचे विलीनीकरण ते ठाकरेंना विधान परिषदेत पाठिंबा, शरद पवार रोखठोक बोलले...

वृत्तसंस्था/ नवी दिल्ली

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी आज पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी विविध मुद्द्यांवर सविस्तर प्रतिक्रिया दिली. बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसकडून उमेदवार जाहीर झाला आहे. त्यामुळे ही निवडणूक चुरशीची होणार आहे. महाविकास आघाडीमधील घटक पक्ष असलेल्या शरद पवारांचा पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या बारामतीमधील बिनविरोध निवडीला पाठिंबा दिला होता. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाल्यामुळे या जागेवर त्यांची पत्नी सुनेत्रा पवार यांची बिनविरोध निवड व्हावी, अशी काही नेत्यांची इच्छा होती. मविआच्या घटकपक्षांचीदेखील ती भूमिका होती. पण काँग्रेसने या निवडणुकीत उमेदवाराची घोषणा केली. त्यामुळे मविआत याबाबत एकमत नसल्याचं स्पष्ट झालं. या घडामोडींवर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी प्रतिक्रिया दिली. एक मोठा राजकीय पक्ष आहे. त्यांना निवडणूक लढण्याचा अधिकार आहे. त्याची फार चर्चा करण्याचं कारण नाही. बिनविरोध निवडून द्या ही मागणी करण्याचं देखील काही कारण नाही. लोकशाहीमध्ये तुम्हाला निवडणूक लढवायची असेल तर समोर कुणीतरी निवडणूक लढवेल हे मान्य करुनच उभं राहायचं असत अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी दिली. यावेळी पत्रकारांनी शरद पवार यांना तुम्ही सुनेत्रा पवार यांचा प्रचार करणार का? असा प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी नाही आम्ही प्रचार करणार नाहीत. प्रचार काय करायचा?, असं उत्तर दिलं. राजकारणात जे पडतात ते लोकांचं काम करण्यासाठी, अजित पवार हे लोकांचे काम करण्यासाठी सक्रिय होते. अजित पवारांबद्दल नागरिकांमध्ये एक आदर आहे. हे मान्य केलं पाहिजे. दुर्दैवाने अपघाती दुर्घटनेत ते गेले. याचं दु:ख कुटुंब म्हणून आम्हा सर्वांना आहे. पवार कुटुंबावर संकट आलेलं आहे. मी कुटुंबप्रमुख आहे. त्यामुळे कुटुंबप्रमुख म्हणून माझ्यावर जबाबदारी आहे, अशी भूमिका शरद पवार यांनी मांडली. दरम्यान, सुनेत्रा पवार यांचा उमेदवारी अर्ज भरताना पार पडलेल्या सभास्थळी लावलेल्या बॅनरवर पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, राज्यातील भाजप नेते यांच्यासह शरद पवार यांचाही फोटो एका बॅनरवर बघायला मिळाला. याबाबत पत्रकारांनी शरद पवार यांना प्रश्न विचारला असता, मोदी-शाहांचा फोटो होते, भाजप नेत्यांचे फोटो होता त्याच चुकीचं काय? त्यांच्या पक्षाचे प्रचार असतील. यात अडचण काय? ते एनडीएमध्ये आहेत ना? तिथल्या बॅनरमध्ये माझा फोटो असेल तर चुकीचं आहे, असं उत्तर शरद पवारांनी दिलं. उद्धव ठाकरेंबाबत विचारलेल्या प्रश्नावरही शरद पवारांनी उत्तर दिलं. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पक्षाच्या वतीने भूमिका मांडणं हा त्यांचा अधिकार आहे. उद्धव ठाकरेंनी मी राज्यसभेवर जायचं म्हटलं त्यावेळेला फोन करुन सांगितलं की आमचा पाठिंबा आहे. त्यामुळे मला असं वाटतं की, त्यांनी आपणहून मला पाठिंबा दिला, सहकार्य केलं त्यामुळे आपणही ते दाखवावंझ्झ, अशी भूमिका शरद पवारांनी मांडली.



एखाद्या राजकीय पक्षाने एक भूमिका घेतली तर तो काही राजकीय इशू नाही किंवा राज्याचा इशू नाही. प्रगती व्हावी म्हणून त्यांनी निर्णय घेतला, अशीदेखील प्रतिक्रिया शरद पवारांनी दिली. कसं आहे, आमच्यावतीने जयंत पाटील आणि तिकडून अजित पवार हे चर्चा करत होते. अजित पवार यांचा अपघाती मृत्यू झाल्यानंतर ही चर्चा थांबली. असा तो विषय आहे. आमच्या पक्षात याची चर्चा नाही. त्यांच्या पाच-सहा बैठका झाल्याझ्झ, असं शरद पवार यांनी स्पष्ट केलं. यावेळी दोन्ही पक्ष आगामी काळात एकत्र येणार का? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला. त्यावर त्यांनी आज तरी ते नाही सांगू शकत, अशी प्रतिक्रिया शरद पवारांनी दिली. पण अजित पवार यांच्या निधनानंतर विलीनीकरणाच्या विषयावर चर्चा झाली नाही, असं शरद पवारांनी स्पष्ट केलं.

# महाराष्ट्राच्या राजकारणात आठ दिवसांत मोठा भूकंप होणार, नाना पटोले यांचं भाकीत...

वृत्तसंस्था/ नागपूर

भाजपचा आजवरचा इतिहास पाहिला तर त्यांनी नेहमीच आपल्या मित्रपक्षांना संपवण्याचे काम केले आहे. आताही भाजप आपल्यास मित्रपक्षांवर डाव टाकत असून आगामी आठ दिवसात राज्याच्या राजकारणात मोठा भूकंप बघायला मिळेल, असा मोठा दावा काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी केला आहे. नाना पटोले रविवारी (५ एप्रिल) नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी पटोले यांनी पाज राज्यांच्या निवडणूक निकालांपूर्वीच ऑपरेशन लोटस पूर्णत्वास जाणार असल्याचा दावा केला आहे. अमरावतीच्या माजी खासदार नवनीत राणा यांनी मध्यंतरी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना आणि शिवसेना उद्धव ठाकरे ठाकरे, तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अनेक बडे नेते, आमदार आणि खासदार भाजपच्या संपर्कात असल्याचा दावा केला होता. याबाबत विचारलेल्या प्रश्नावर नाना पटोले यांनी मित्र पक्षांना संपवणे हा भाजपचा इतिहासच असल्याचे सांगितले. भाजप हा इतरांना गिळंकृत करणारा पक्ष आहे. देशभरातील भाजपच्या



मित्र पक्षांचे काय झाले यावर नजर टाकल्यास शिंदे सेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे फार काही भवितव्य दिसत नाही. त्यांचे नेते भाजपमध्ये सामील झाल्यास नवल वाटण्याचे कारण नाही. याची सुरुवात झाली आहे. असे झाल्यास राज्यात यापुढे भाजप आणि काँग्रेस हे दोनच पक्ष शिल्लक राहतील, असे नाना पटोले म्हणाले. भाजप हा अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचा गेम करणार असल्याचे मी आधीच बोललो होतो. आणखी मोठा खेळ शिल्लक आहे. फक्त आठ दिवस थांबा हे तुम्हाला दिसेल. महाराष्ट्राची जनता भाजपच्या या खेळाला कंटाळली आहे. त्यांना पुन्हा सत्तेवर काँग्रेस हवी आहे. मात्र सरकारने बॅलेटवर मतदान घेतले तर जनता भाजपला त्यांची जागा दाखवून देली, असा दावाही नाना पटोले यांनी केला. यावेळी भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणावर विचारले असता नाना पटोले म्हणाले, अशोक खरात हा सत्ताधाऱ्यांनीच पोसलेला बाब असून त्याच्या आश्रमात बड्या नेत्यांची आणि अति महत्वाच्या व्यक्तींची ये-जा होती. यानंतर सरकार आणि गृहमंत्र्यांना त्याची माहिती नाही हे पटण्यासारखे नाही. सरकारनेच त्याला पाठीशी घातले. आता हे प्रकरण अंगलट असल्यामुळे सरकारची कोंडी झाली आहे, असा आरोप नाना पटोले यांनी केला.

# शेजारची सत्तांतरे आणि आपण



भारताचे निकट शेजारी असलेल्या बांगलादेश आणि नेपाळ या देशांमध्ये नुकत्याच निवडणुका होऊन नवी सरकारे सत्तेवर आल्यानंतर भारताच्या राजकीय वर्तुळात समाधानाचे वातावरण आहे. बांगलादेशात तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना विद्यार्थी आंदोलनात पदच्युत झाल्यानंतर आलेले महंमद युनुस यांचे कार्यवाहक सरकार आणि नेपाळात के. पी. शर्मा ओली यांचे सरकार भारतविरोधी वातावरण भडकवूनच आपली सत्ता भक्कम करण्याचा प्रयत्न करीत होते. दोन्ही देशांत प्रस्थापित सरकारांविरुद्ध तरुण जेन झी पिढीने अत्यंत हिंसक आंदोलने केली व या सरकारांना पदभ्रष्ट केले. बांगलादेशात शेख हसीना यांच्या सरकारने भारताशी चांगले संबंध ठेवले असले तरी या सरकारविरुद्ध देशात असंतोष होता. या असंतोषाचे रूपांतर विद्यार्थी आंदोलनात होऊन शेख हसीना यांना ऑगस्ट २०२४ मध्ये सत्ता सोडावी लागली. त्यानंतर तेथे महंमद युनुस यांचे हंगामी सरकार आले. पण या सरकारने सत्तेवर आल्यापासून भारतविरोधी धोरण राबविण्यास सुरुवात केली. खरे तर युनुस यांचे सरकार ही एक तात्पुरती व्यवस्था होती व त्याच्यावर फक्त देशात निवडणुका घेण्याची जबाबादारी होती. पण या सरकारने निवडणुका घेण्यास टाळाटाळ करून धोरणविषयक निर्णय घेण्यास सुरुवात केली. त्यामुळे या सरकारविरोधातही देशात वातावरण निर्माण होऊ लागले व निवडणुकांसाठी युनुस सरकारवर दबाव वाढू लागला. त्यामुळे गेल्या फेब्रुवारीत देशात निवडणुका घेण्यात आल्या. त्यात बांगलादेश नॅशनालिस्ट पार्टी (बीएनपी) ही बहुमत मिळवून सत्तेवर आली. या पक्षाचे नेते तारीक रहमान हे पंतप्रधान झाले. नेपाळमध्येही पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांच्याविरुद्ध जेन झी पिढीचे असेच हिंसक आंदोलन झाले आणि ओली यांनाही पदभ्रष्ट व्हावे लागले. तेथेही त्यामुळे हंगामी कार्यवाहू सरकार आले. या सरकारने मात्र निवडणुका घेण्याचे आपले कर्तव्य पार पाडले. या निवडणुकीत तरुणांच्या राष्ट्रीय स्वतंत्र पार्टीला दोन तृतीयांश बहुमत मिळाले व या पक्षाचे तरुण नेते बालेन्द्र शहा यांची पंतप्रधानपदी निवड झाली. बांगलादेश आणि नेपाळ या आपल्या दोन्ही निकट शेजारी देशांत नि:पक्षपाती आणि शांततापूर्ण वातावरणात निवडणुका झाल्याबद्दल भारत सरकारने समाधान व्यक्त केले आणि नव्या पंतप्रधानांना त्यांच्या निवडीबद्दल शुभेच्छा दिल्या. या दोन्ही देशांतील नव्या सरकारांची भारतविषयक धोरणे अद्याप स्पष्ट व्हायची असली तरी तेथील भारतविरोधी सरकारांना या निवडणुकीत तेथील जनतेने पराभूत व पदभ्रष्ट केल्यामुळे भारत सरकारमध्ये समाधानाचे वातावरण आहे. नव्या सरकारच्या प्रमुखांनी निवडणूक प्रचाराच्या काळात भारतासंबंधी काहीही अनुचित व दोन्ही देशांच्या संबंधांना बाधा येईल अशी विधाने केली नाहीत किंबहुना त्यांच्या निवडणूक प्रचारात भारत हा मुद्दा फारसा आला नाही. दोन्ही देशांतील निवडणुका आधीच्या सरकारांचा भ्रष्ट कारभार, मंत्र्यांचा भ्रष्टाचार आदी मुद्द्यांवरच लढल्या गेल्या, ही पण भारताच्या दृष्टीने समाधानाची गोष्ट होती. बांगलादेशात निवडणुकीतील एक प्रमुख पक्ष जमाते इस्लामी हा पाकिस्तानवादी व भारतविरोधी मानला जातो, पण या पक्षानेही निवडणूक प्रचारासाठी भारतविरोधाचा वापर केला नाही, हे महत्त्वाचे. अर्थात या दोन्ही देशांतील निवडणुकीच्या काळात भारताने सर्व पक्षांशी संपर्क ठेवला व आपण कोणत्याच एका पक्षाच्या पारड्यात वजन टाकणार नसून तेथील जनतेचा जो काही कौल असेल तो आपण मान्य करणार असल्याचे संकेत दिले. त्यामुळे निवडणुकीनंतर या देशांतील नवी सरकारे आणि भारत सरकार यांच्यात सुरळीत व निरपेक्ष संपर्क होऊ शकला आणि ङ्गनवी पाटी, नवे राज्यफ या पद्धतीने संबंध सुरू करता आले. बांगलादेशात निवडणुकीच्या तोंडावरच बीएनपीच्या नेत्या व पंतप्रधान तारीक यांची आई बेगम खालेदा झिया यांचे निधन झाले. त्यांच्या अंत्यविधीसाठी भारतातर्फे परराष्ट्रमंत्री जयशंकर यांना पाठवून भारताने बीएनपीचे नवे नेते तारीक रहमान यांना अनुकूल संदेश दिला होता. त्यामुळे पुढे तारीक हे पंतप्रधान झाल्यावर दोन्ही देशांच्या सरकारात सुसंवाद सुरू झाला होता. त्यानंतर लगेच पश्चिम आशियात इराणविरुद्धचे युद्ध सुरू होऊन इंधनतेलाची टंचाई सुरू झाली तेव्हा बांगलादेशने भारताकडे इंधन तेल पुरवठ्याची मागणी केली. भारत व बांगलादेश यांच्यात २०१५ सालापासून तेलपुरवठ्याचा करार झाला आहे. भारत नुमालीगढ रिफायनरीमधून दोन्ही देशांत असलेल्या पाइपलाइनमधून बांगलादेशला तेलपुरवठा करीत असे. पण युनुस महंमद यांनी भारतविरोधी धोरण अवलंबल्यानंतर हा तेलपुरवठा बंद करण्यात आला होता. आता तारीक यांच्या विनंतीनंतर भारताने जगात तेलटंचाई असतानाही दोन्ही देशांच्या मैत्रीखातर हा पुरवठा पुन्हा सुरू केला आहे. भारताने मार्च महिन्यात बांगलादेशला पाच हजार टन डिझेल पुरवले आहे व आणखीही पुरविण्याची तयारी दाखवली आहे. युनुस महंमद यांच्या काळात त्यांच्या हंगामी सरकारने बांगलादेश मुक्तिलढ्याचा इतिहास मिटवून पाकिस्तानशी सुरक्षा संबंध वाढविण्याच्या हालचाली सुरू केल्या होत्या. पण तारीक रहमान यांनी पंतप्रधानपद स्वीकारल्यानंतर २५ मार्चच्या बांगलादेश मुक्तिलढ्याच्या वर्धापनदिनानिमित्त पाकिस्तानने केलेल्या अत्याचारांचा पाढा वाचला आणि हे अत्याचार बांगलादेशी जनता कधीच विसरू शकत नाही, असे सांगून त्यांचे सरकार पाकिस्तानशी अंतर ठेवणार असल्याचे संकेत दिले. हा दिवस बांगलादेशच्या नवी दिल्लीतील उच्चायुक्तालयात साजरा करण्यात आला. यावेळी भारताचे परराष्ट्र राज्यमंत्री किर्तीवर्धन सिंग हे उपस्थित होते. त्यावेळी बांगलादेशचे उच्चायुक्त रियाझ हमीदुल्ला यांनी बांगलादेश मुक्तिवाहिनीला भारतीयांनी केलेल्या भरभरून मदतीची आठवण काढली व ही मदत बांगलादेश कधीच विसरू शकत नाही, असे सांगत भारत व बांगलादेश संबंधाची भावी दिशाच स्पष्ट केली.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



## बारामती पोटनिवडणूक आणि भोंदूबाबा प्रकरणावरही भाष्य..

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या चर्चांना शरद पवारांनी दिला विराम

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी, राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाच्या चर्चांना सोमवारी विराम दिला. राज्यसभेच्या सदस्यत्वाची शपथ घेतल्यानंतर दिल्लीमध्ये पत्रकार परिषदेत शरद पवार यांनी विलीनीकरणावर पहिल्यांदाच थेट भाष्य केले.

विलीनीकरणाबाबत जयंत पाटील व अजित पवार हे दोन्ही नेते चर्चा करत होते. अजित पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर या चर्चा थांबल्या आहेत. विलीनीकरणासंदर्भात आतापर्यंत चर्चेच्या पाच ते सहा फेऱ्या झाल्या असून त्याची संपूर्ण माहिती या दोन्ही नेत्यांनी मला दिली होती. आता विलीनीकरणावर आमच्या पक्षात चर्चा झालेली नाही, असे शरद पवार यांनी स्पष्ट केले. भविष्यात विलीनीकरण होईल का, या प्रश्नावर मात्र आज हे सांगणे अशक्य आहे. अजित पवार यांचा विलीनीकरणाबाबतचा दृष्टिकोन



समाधानकारक होता, आता ते नसल्याने त्याबाबत चर्चा पुढे चालू राहिली नाही, असे पवार म्हणाले.

लोकांची सेवा करण्यासाठी राजकारणात आले पाहिजे, असे सांगत पवार म्हणाले की, अजित पवार जनतेचे काम करण्यासाठी सक्रिय होते आणि त्यांचा आदर केला जात होता. पण दुर्दैवाने अपघातात त्यांचे निधन झाले. आज कुटुंबाचा प्रमुख म्हणून माझ्यावर जबाबदारी आहे. कुटुंबाचा प्रमुख भविष्यातील वाटचालीचा निर्णय घेतो, ही आमच्या कुटुंबाची परंपरा आहे. या नात्यानेच बारामती पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार यांच्या विरोधात उमेदवार उभा न करण्याचा निर्णय घेतला, असेही पवार म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) अध्यक्ष सुनेत्रा पवार यांनी बारामती पोटनिवडणूक बिनविरोध होण्यासाठी काँग्रेस, शिवसेना ठाकरे गटाशी संपर्क केला होता. पण काँग्रेसने सुनेत्रा पवार यांच्याविरोधात उमेदवार उभा केला आहे. त्याबद्दल, राष्ट्रीय पक्षांनी उमेदवार उभे करण्यात काहीही चुकीचे नाही. हा पक्षाचा निर्णय असतो व त्यांचा तो हक्कही आहे. बिनविरोध निवडणुकीची मागणी करणे चुकीचे आहे, लोकशाहीत निवडणूक लढवणे ही स्पर्धा असते. काँग्रेसने सुनेत्रा पवार यांना पाठिंबा न दिल्याबद्दल पार्थ पवार यांनी टीका केली. त्यावर, पक्ष नेतृत्वाकडे बोलण्याचा अधिकार असतो. राजकारणात वावरण्यासाठी परिपक्वतेची आवश्यकता असते, ती त्यांच्यात कितपत आहे, हे सांगू शकत नाहीत, अशी कोपरखळी शरद पवार यांनी मारली.

### लवकरच राज्याचा दौरा

काँग्रेस व शिवसेनेच्या ठाकरे गटाने पाठिंबा दिल्यानंतर महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून शरद पवार यांची राज्यसभेवर बिनविरोध निवड झाली. त्यांनी सोमवारी राज्यसभेत जाऊन शपथही घेतली. न्यूमोनियामुळे महिनाभर रुग्णालयात राहिल्यामुळे शपथविधीला जाताना व्हीलचेअरचा आधार घ्यावा लागला, असे शरद पवार म्हणाले. लवकरच संपूर्ण राज्याचा दौरा करणार असल्याचेही पवारांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

### राज्यात भोंदू बाबा वाढले

भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणावरही शरद पवारांनी भाष्य केले. आजकाल महाराष्ट्रात बनावट बाबांची संख्या वाढत आहे. एकीकडे शाहू-फुले-आंबेडकरांच्या पुरोगामी विचारांची चर्चा होते पण, दुसरीकडे लोकप्रतिनिधी अशा भोंदूबाबांना भेटतात. हे महाराष्ट्राच्या विचारधारेच्या पूर्णपणे विरुद्ध आहे. कोणी किती फोन केले, हे माझ्या वाचनात आले आहे. राजकारणात आणि समाजात उच्च पदांवर असलेले अनेक लोक या प्रकरणात गुंतलेले आहेत. ही परिस्थिती महाराष्ट्राच्या प्रतिष्ठेसाठी अजिबात चांगली नाही, असे पवार म्हणाले. मी पंढरपूरला पांडुरंगाच्या व तुळजापूरला तुळजाभवानीच्या दर्शनाला जातो. निवडणुकीवेळी कान्हेरी गावात मारुतीचेही दर्शन घेतो. पण त्याची जाहीर वाच्यता करत नाही, असे पवार म्हणाले.

---

# आसाममध्ये भाजपची पकड मजबूत, काँग्रेसचे पुनरागमनाचे प्रयत्न तीव्र



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** आसाम हे एकेकाळी काँग्रेसचे हक्काचे राज्य होते. मात्र गेल्या १० वर्षांत भाजपने या राज्यावरील आपली पकड घट्ट केली आहे. २०११ च्या विधानसभा निवडणुकीत केवळ पाच जागा जिंकणाऱ्या भाजपने २०१६ आणि २०२१ च्या निवडणुकीत ६० पेक्षा जास्त जागा जिंकल्या आहेत. आधी सोनोवाल आणि आता हिमंता बिस्वा सर्मा यांनी हिंदुत्वाचा मुद्दा हाताशी धरून राज्य केले.

भाजपच्या 'संकल्पचित्र' या जाहीरनाम्यात घुसखोरांविरोधात कठोर कारवाई करण्यात येईल, 'लव्ह जिहाद', 'लँड जिहाद'विरोधात कडक कायदे, समान नागरी कायदा तीन महिन्यांत लागू अशा प्रकारची आश्वासने दिली आहेत. भाजप नेते बांगलादेशी घुसखोरीचा आणि आसामच्या अस्मितेचा मुद्दा प्रचारात सातत्याने वापरत आहेत. मुख्यमंत्री सर्मा यांनी अनेक प्रचारसभांमध्ये मियाँ (बांगलादेशी मुस्लीम) यांना हाकलून द्यावे, असे उघडपणे सांगितले, तर केंद्रीय मंत्री व माजी मुख्यमंत्री सर्बानंद सोनोवाल यांनीही मतपेढीच्या राजकारणासाठी बेकायदा स्थायिकांना प्रोत्साहन दिल्याबद्दल पूर्वीच्या काँग्रेस सरकारला जबाबदार धरले. अस्मितेचे राजकारण आणि स्थलांतरविरोधी मुद्द्यांवरील तीव्र वक्तव्यांमुळे आसाममधील अल्पसंख्याक समुदायाच्या टीकेला सामोरे जावे लागल्याने गेल्या चार दिवसांपासून भाजपने लक्ष घुसखोर आणि अस्मितेच्या राजकारणावरून हटवून युवा सक्षमीकरण आणि पूर निवारणाकडे वळवले आहे. युवककल्याण, महिला प्रश्न, रोजगार आदी मुद्दे काही दिवसांपासून प्रचारात महत्त्वाचे म्हणून घेतले जात आहेत. काँग्रेसने राज्यातील लहानसहान पक्षांना बरोबर घेऊन रणनीती आखली आहे. भाजपने गेल्या दशकभरात सामाजिक सलोखा बिघडवला असून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केल्याचा आरोप करत काँग्रेसने भाजपविरोधात मोहीम आखत मुख्यमंत्री हिमांता सरमा यांना लक्ष्य केले आहे. मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सर्मा, लोकसभेतील विरोधी पक्ष उपनेते गौरव गोगोई, रायजोर दलाचे नेते अखिल गोगोई आणि आसाम विधानसभेतील विरोधी पक्षनेते देबब्रता सैकिया, भाजपमध्ये नुकताच प्रवेश केलेले काँग्रेस खासदार प्रद्युत बोरदोलोई, भाजपमधून काँग्रेसमध्ये आलेल्या नंदिता गारेलोसा, पाच वेळा आमदार असलेले हितेंद्रनाथ गोस्वामी, आसाम जातीय परिषदेचे अध्यक्ष लुरिंज्योती गोगोई.

# युद्धग्रस्त इराणमधून १,७७७ भारतीयांची सुटका

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** परराष्ट्र मंत्रालयाने (MEA) दिलेल्या माहितीनुसार पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, भारताने इराणमधून १,७७७ भारतीय नागरिकांच्या मायदेशी परतण्याची सोय केली आहे. मंत्रालयाने नमूद केले की, इराण, आर्मेनिया आणि अझरबैजानच्या अधिकाऱ्यांच्या पाठिंब्यामुळे ही सोय शक्य झाली.

अलीकडील घडामोडींवर बोलताना, परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितले की, तेहरानमधील भारतीय दूतावास लोकांना बाहेर काढण्याच्या प्रयत्नांमध्ये सातत्याने समन्वय साधत आहे. "आमच्या तेहरानमधील दूतावासाने आतापर्यंत इराणमधील १,७७७ भारतीय नागरिकांना आर्मेनिया आणि अझरबैजानमध्ये जाण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तेथून ते विमानाने भारतात परत येत आहेत," असे ते म्हणाले.

त्यांनी पुढे सांगितले की, या एकूण संख्येत





८९५ भारतीय विद्यार्थी आणि इराणमधील विविध कंपन्यांमध्ये कामाला असलेले ३४५ भारतीय मच्छीमार यांचा समावेश आहे. या मच्छीमारांना ओर्मेनियामार्गे बाहेर काढण्यात आले आणि ते ४ एप्रिल रोजी विमानाने भारतात परतले, चेन्नई येथे उतरले.

भारतीय नागरिक मायदेशी दाखल झाल्यावर परराष्ट्र मंत्री (ईएएम) एस जयशंकर यांनी संघर्षाच्या काळात इराणमधून भारतीय मच्छिमारांना बाहेर काढण्याची सोय केल्याबद्दल आर्मेनिया परराष्ट्र मंत्री अरारत मिर्झोयान यांचे आभार मानले. "आज इराणमधून भारतीय मच्छिमारांना आर्मेनियामार्गे भारतात परत आणण्यासाठी मदत केल्याबद्दल परराष्ट्र मंत्री अरारत मिर्झोयान आणि आर्मेनिया सरकारचे आभार," असे जयशंकर यांनी X वरील एका पोस्टमध्ये लिहिले. परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी पुढे सांगितले की, भारतीय नागरिकांव्यतिरिक्त, दूतावासाने बांगलादेश आणि श्रीलंका या दोन परदेशी नागरिकांनाही मायदेशी परत आणण्यासाठी मदत केली. याविषयी माहिती देताना जैस्वाल म्हणाले की, १,५४५ भारतीय नागरिक अर्मेनियामध्ये दाखल झाले, तर स्थलांतर प्रक्रियेचा भाग म्हणून २३४ जणांना अझरबैजानमध्ये हलवण्यात आले.

"दूतावासाने भारतीय नागरिकांसोबतच, बांगलादेश आणि श्रीलंका येथील प्रत्येकी एका अशा दोन परदेशी नागरिकांच्या प्रवासाचीही सोय केली आहे. एकूण १,५४५ भारतीय नागरिकांनी आर्मेनियातून आणि २३४ जणांनी अझरबैजानमध्ये प्रवेश केला," असे परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी सांगितले.

# डोनाल्ड ट्रम्प यांचा इराणला पुन्हा मोठा इशारा

**सिल्वासा/वृत्तसंस्था :** गेल्या एका महिन्यापासून अमेरिका-इराण युद्ध सुरू आहे. २८ फेब्रुवारीपासून पेटलेल्या या युद्धाची धग अद्यापही कायम असून या युद्धात आतापर्यंत इराणचं मोठं नुकसान झालं आहे. इराणच्या महत्वाच्या नेत्यांसह काही लष्करी अधिकाऱ्यांचा आणि शेकडो नागरिकांचा यात मृत्यू झाला आहे. तसेच या युद्धाचा जगातील अनेक देशांवर आणि जागतिक व्यापारावर मोठा परिणाम झाला आहे.



या युद्धामुळे अनेक देशांत इंधनाचा तुडवडा जाणवत आहे. मात्र, तरीही अद्याप हे युद्ध थांबलेलं नाही. होर्मुझ सामुद्रधुनीमध्येही तणाव निर्माण होत असल्यामुळे जगभरातील तेल आणि वायूच्या वाहतुकीला अडथळे निर्माण होत आहे. अखेर आता युद्धविरामाच्या चर्चा सुरू आहेत. पण एकीकडे युद्धविरामाच्या चर्चा, शांततेचा प्रस्ताव देण्याच्या हालचाली सुरू असताना दुसरीकडे डोनाल्ड ट्रम्प हे इराणला सातत्याने धमकावत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. ट्रम्प यांच्या या धमकीमुळे हे युद्ध अधिक चिघळण्याची शक्यता वाढली आहे. दरम्यान, अमेरिका आणि इराणमध्ये ४५ दिवसांच्या शस्त्रसंधीसाठी हालचाली सुरू आहेत. मात्र, ४५ दिवसांच्या शस्त्रसंधीसाठी इराण तयार नसून संपूर्ण युद्ध थांबण्यासाठी इराण आग्रही आहे. तसेच शस्त्रसंधी तात्पुरती असेल तर होर्मुझ सामुद्रधुनी बंदच राहणार असल्याची भूमिका इराणने मांडली. मात्र, इराणच्या या भूमिकेनंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा संताप व्यक्त करत इराणला मोठा इशारा दिला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी सांगितलं की ते इराणवर अत्यंत नाराज आहेत. यावेळी इराणबरोबरील युद्धाबाबत बोलताना ट्रम्प यांनी इशारा दिला की, 'जर तेहरान करार करण्यास अयशस्वी ठरला, तर त्यांना मोठी किंमत मोजावी लागेल. कारण त्यांनी स्वतःहून ठरवलेली अंतिम मुदत आता जवळ आली आहे.' व्हाइट हाऊसबाहेर पत्रकारांशी बोलताना ट्रम्प यांनी हे भाष्य केलं आहे. ट्रम्प यांनी स्पष्ट केलं की, इराणने अटी मान्य करण्यासाठी दिलेली अंतिम मुदत ही मंगळवारची आहे. त्यामुळे जर त्यांनी त्यांचं कर्तव्य पार पाडलं, तर हे प्रकरण खूप लवकर संपू शकतं. त्यामुळे आता त्यांना काही गोष्टी कराव्याच लागतील. हे त्यांनाही माहिती आहे.

# शिंदेंच्या कार्यकर्त्याला भल्या पहाटे संपवलं, आरोपीचा पोलिसांवर गोळीबार, अखेर सिनेस्टाईल नांग्या ठेचल्या

**नांदेड :** नांदेडमध्ये जे काही सध्या सुरु आहे ते बॉलिवूडच्या एखाद्या गुन्हेगारीशी संबंधित थ्रिलर चित्रपटापेक्षा कमी नाही. नांदेडमध्ये सोमवारी (6 एप्रिल) पहाटे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा कार्यकर्ता सोनू कल्याणकर याच्यावर जीवघेणा हल्ला झाला. या हल्ल्यात सोनू कल्याणकर यांचा मृत्यू झाला आहे. सोनू कल्याणकर यांचा खून करणाऱ्या आरोपींना पोलिसांनी शोधून काढलं आहे. पोलिसांनी चार आरोपींना ताब्यात घेतलं आहे. यापैकी चौथ्या आरोपीला पकडण्यासाठी गेलेल्या पोलिसांवर आरोपीनेच हल्ल्याचा प्रयत्न केला. त्याने पोलिसांच्या दिशेला गोळीबार केला. त्याला पोलिसांनी देखील प्रत्युत्तर दिलं. पोलिसांनी प्रत्युत्तर देत असताना आरोपीच्या पायावर गोळी झाडली. त्यामुळे आरोपी जखमी झाला. सध्या या आरोपीवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. पण या घटनेमुळे नांदेडमध्ये खळबळ उडाली आहे.पूर्व वैमन्यसातून हा प्रकार घडल्याचा संशय पोलिसांकडून व्यक्त केला जातं आहे. रोहित लोट, प्रसाद शिंदे, अंकुश गंधमवाड आणि कृष्णा जोगदंड असं अटक करण्यात आलेल्या आरोपीची




नावे आहेत. सलग तीन दिवस घडलेल्या खुनाच्या घटनेने नांदेड शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहेराजकीय पक्षाचा कार्यकर्ता असलेला सोनू कल्याणकर या 35 वर्षीय तरुणाचा आज सकाळी चार जणांनी खंजरने अनेक वार करून निर्घृणपणे खून केला. मॉर्निंगवॉकसाठी गेला असता श्रीनगर भागात आरोपीने त्याच्यावर हल्ला केला. रक्तबंबाळ झालेल्या कल्याणकर याचा रुग्णालयात नेण्यापूर्वीच मृत्यू झाला.दरम्यान, घटनेनंतर पोलिसांनी आरोपींची धरपकड सुरु केली. सुरुवातीला पोलिसांनी रोहित लोट, प्रसाद शिंदे आणि कृष्णा जोगदंड याला ताब्यात घेतले. अंकुश गंधमवार हा ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील झरी येथे असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली. पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे आणि त्यांचे पथक त्याचा पाठलाग करत असताना आरोपी गंधमवाड याने पोलिसांवर पिस्तूलने गोळीबार करण्याच्या प्रयत्न केला. त्याला प्रत्युत्तर देत पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे यांनी आपल्या जवळील रिव्हॉल्वरमधून त्याच्या पायावर गोळी झाडून त्याला जखमी केले.आरोपी अंकुश गंधमवाड याला रुग्णालयात दाखल केले असून प्रकृती धोक्याबाहेर असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या हत्याकांडाच्या घटनेने खळबळ उडाली आहे. दरम्यान ही घटना पूर्ववैमनस्यातून घडली का इतर कारण आहे? याचा तपास पोलीस करत आहेत. धक्कादायक म्हणजे मयतावर चार वर्षापूर्वी गोळीबार करण्यात आला होता. त्यात तो थोडक्यात बचावला. गोळीबार करणारा आरोपी सध्या जेलमध्ये आहे. त्याने हे कांड घडवलं असावं, असा संशय देखील पोलिसांकडून व्यक्त केलं जात आहे.

## मेट्रो आरामदायी असूनही घाटकोपर-अंधेरी मार्गावर बस प्रवासालाच पसंती

**मुंबई :** मुंबई शहरांत दिवसेंदिवस मेट्रोचे जाळे विस्तारत चालले आहे. शहरात सर्वात पहिली मेट्रो घाटकोर ते अंधेरीदरम्यान सुरू झाली. दररोज, हजारो नागरिक या मेट्रोचा लाभ घेतात. मेट्रो लाइन 1 ला सुरू होऊन अनेक वर्ष झाले असतील तरी घाटकोपर ते अंधेरी प्रवास करणाऱ्या नागरिकांकडून अजूनही बेस्ट बसला पसंती देण्यात येत आहे. घाटकोपर पश्चिम रेल्वे स्थानक ते अंधेरी पूर्वेतील आगारकर चौकापर्यंत A-340ही बस जाते. मेट्रो 1 सुद्धा त्याच मार्गावरून धावत असली तरी नागरिक बसला जास्त पसंती देत आहेत.बसला मेट्रोपेक्षा अधिक प्रतिसाद मिळण्याचं एकच कारण, बस सहजपणे उपलब्ध आहे. घाटकोपर ते अंधेरी मार्गावर मेट्रोमध्ये केवळ 8 स्थानकं आहेत. पण बस क्रमांक A-340च्या मार्गावर याच अंतरादरम्यान, 20 थांबे आहेत. त्यामुळे प्रवाशांना जास्त कनेकटीव्हीटी मिळते. शहरांत प्रवास करताना प्रवाशांसाठी 'लास्ट माइल कनेकटीव्हीटी' अत्यंत महत्त्वाची आहे. कर्मचाऱ्यांना कार्यालयाजवळ पोहोचवणे महत्त्वाचे असते. त्यामुळे प्रवासी बसने प्रवास करण्याला प्राधान्य देतात.प्रत्येक दोन मेट्रो स्थानकांच्यामध्ये 3-5 बसचे थांबे आहेत. तसेच, हे थांबे नेहमीच्या प्रवाशांसाठी महत्त्वाच्या ठरणाऱ्या ठिकाणी आहेत. प्रवाशांना बस अधिक जवळ पोहोचवते. त्यामुळे मेट्रोच्या सहज प्रवासापेक्षा ते बसचे धक्के खात प्रवास करण्याला पसंती देतात. ही बेस्ट बस चाकला, जे बी नगर, मरोळ, साकी नाका सारख्या ठिकाणांवरून जाते. या भागांत अनेक कंपन्यांची कार्यालय असून कर्मचाऱ्यांना बस अधिक सोयीस्कर वाटते.दरम्यान, पीक आव्हरवेळी मेट्रोमध्ये तुडूंब गर्दी असते. बसमध्ये गर्दी असली तरी श्वास घेण्यासाठी जागा असते आणि कोंडल्या सारखे वाटते असे समीर मोरे या प्रवाशाचे म्हणणे आहे. दरम्यान, या दोन्ही मार्गांवरती एक सारखेच भाडे आहे. घाटकोपर ते अंधेरी दरम्यान, 20 रुपये मेट्रो आणि एसी बसचं पण भाडं तेवढचं आहे. मेट्रोमध्ये चढायला, मेट्रो स्थानकावरून रवाना व्हायला आणि परत खाली उतरायला जितका वेळ जातो तेवढ्यात बसने बरेच अंतर पार होते. यामुळे फक्त 4-5 मिनिटे वेळ वाचततो, तरी कर्मचाऱ्यांसाठी हे 5 मिनिटेही मोलाचे असतात असे काही प्रवाशांचे मत आहे. A-340 बसने दररोज, 850 प्रवासी प्रवास करतात. तसेच, सकाळी गर्दीच्या वेळी दर 5 ते 10 मिनिटांनी बस उपलब्ध असल्यामुळे प्रवास करणं सोपं होतं.

## घरी आलेल्या तरुणाचा कार अपघातात मृत्यू

**नाशिक :** अमेरिकेतून हॉटेल मॅनेजमेंटची पदवी घेत पुन्हा नाशिकमध्ये परतलेल्या उच्चशिक्षित तरुणाचा भरधाव कार झाडावर आदळून झालेल्या अपघातात मृत्यू झाल्याची घटना नाशिक-गिरणारे रस्त्यावरील गोदावरी नदीच्या पुलाजवळ घडली.शंतनू जयंत बुऱ्हाडे (वय २४, रा. जेलरोड) असे मृत तरुणाचे नाव आहे. कारमधील त्याचे दोन मित्र गंभीर जखमी झाले असून, शंतनू हा बुऱ्हाडे कुटुंबातील एकुलता मुलगा होता.

त्याच्या कुटुंबीयांच्या आक्रोशामुळे जेलरोड परिसर सुन्न झाला होता. नाशिक तालुका पोलिस ठाण्यात या प्रकरणात अपघातासह अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. शनिवारी दुपारी चारच्या सुमारास शंतनू मित्रांसमवेत कार (एमएच ४६, झेड ००६७) मधून पर्यटनासाठी गंगापूर धरण परिसरात गेला होता. रात्री साडेआठच्या सुमारास गिरणारे परिसरातून नाशिककडे परतत असताना गोदावरी नदी पुलाजवळ त्याचे नियंत्रण सुटल्याने कार थेट रस्त्यावरील झाडावर आदळली.या अपघातात कारचा चक्काचूर झाला होऊन शंतनूच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती.

## मोठे मासे गळाला लागण्याची चिन्हे, बड्या पदावरील महिला अधिकारी रडारवर

**नाशिक :** अशोक खरात प्रकरणात दररोज नवनवीन माहिती समोर येत आहे. अशोक खरात याने पीडित महिलांच्या आधारकार्ड आणि पॅनकार्डचा वापर करुन पतपेढ्यांमध्ये खाते उघडले होते. पण याबाबत महिलांना माहिती नसायची. त्या खात्यांच्या माध्यमातून त्याने कोट्यवधी रुपयांचा व्यवहार केल्याची माहिती तपासातून समोर आली आहे. तसेच अशोक खरात याच्या मुलाला पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतलं तेव्हा त्याने घरात दररोज मोठ्या प्रमाणात कॅश यायची, अशी कबुली दिल्याची माहिती समोर आली आहे. आगामी काळात अशोक खरात प्रकरणात ईडी चौकशीदेखील होईल, अशी माहिती स्वत: महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. या सर्व घडामोडी ताज्या असतानाच आज नवीन माहिती समोर आली आहे. नाशिकमध्ये एकेकाळी बड्या पदावर कार्यरत असलेल्या महिला पदाधिकाऱ्याने अशोक खरात याला नियमबाह्य मदत केल्याचा आणि दोघांमध्ये पैशांचा व्यवहार झाल्याचा पोलिसांना संशय आहे. त्यामुळे ही महिला अधिकारी आता पोलिसांच्या रडारवर आली आहेनाशिकमधील बहुचर्चित भोंदूबाबा अशोक



खरात प्रकरण आता एका नव्या वळणावर येऊन ठेपले आहे. या प्रकारणाचा तपास करणाऱ्या SIT पथकाच्या हाती खळबळजनक पुरावे लागले आहेत. अशोक खरातला मदत करणारी एक तत्कालीन उच्चपदस्थ महिला अधिकारी आता पोलिसांच्या रडारवर आली आहे. यामुळे प्रशासकीय वर्तुळात देखील एकच खळबळ उडाली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित महिला अधिकारी नाशिकमध्ये कार्यरत असताना या महिला अधिकारीने अशोक खरातला अनेक प्रशासकीय कामांमध्ये नियमबाह्य मदत केली होती. या मदतीच्या बदल्यात भोंदूबाबा अशोक खरात याने आपले राजकीय लागेबांधे आणि नेटवर्क वापरून या महिला अधिकाऱ्याला हवी असलेली पोस्टिंग मिळवून देण्यात महत्वाची भूमिका बजावली होती.

# पेनड्राईव्हमध्ये 7 महिलांचे 120 आक्षेपार्ह व्हिडीओ, कार्यालयात प्राण्यांचे अवयव

**नाशिक :** नाशिकमध्ये भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणामुळे मोठी खळबळ उडाली असतानाच महिलांच्या लैंगिक शोषणाची आणखी एक घटना समोर आली आहे. एका व्यवसायिकाच्या कार्यालयात अनेक महिलांचे लैंगिक शोषण झाल्याची घटना समोर आली आहे. रवींद्र एरंडे असं संशयित आरोपीचं नाव आहे. रवींद्र एरंडे याच्या कार्यालयातील ऑफिस बॉयमुळे हे प्रकरण उघडकीस आलं. रवींद्र एरंडे याला आज न्यायालयात हजर करण्यात आलं. यावेळी दोन्ही बाजूने जोरदार युक्तिवाद करण्यात आला. तपास अधिकाऱ्यांनी या प्रकरणात काय-काय माहिती मिळाली याबाबत न्यायालयात माहिती दिली. तसेच पुढील तपासासाठी पोलीस कोठडीची मागणी करण्यात आली. त्यावर आरोपीच्या वकिलांनी युक्तिवाद केला. आरोपीच्या वकिलांनी पोलीस कोठडीला विरोध केला. पण न्यायालयान दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर संशयित आरोपी



रवींद्र एरंडे याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. नाशिकच्या सातपूर इथल्या महिलांचे लैंगिक शोषण केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या संशयित आरोपी रवींद्र एरंडे याच्या पोलीस कोठडीत न्यायालयाने 10 एप्रिलपर्यंत चार दिवसांची वाढ केली आहे. पोलीस तपासात आरोपीच्या पेनड्राईव्हमधून 7 महिलांचे तब्बल 120 आक्षेपार्ह व्हिडिओ मिळून आल्याने या प्रकरणाचे गांभीर्य अधिक वाढले आहे.या प्रकरणातील तपास अधिकारी सचिन बारी यांनी सरकारची बाजू मांडत सुनावणी दरम्यान धक्कादायक खुलासे केले. आरोपीच्या घर आणि कार्यालयाच्या झडतीमध्ये महत्वाची कागदपत्रे आणि नोंदी आढळून आल्या आहेत. तसेच धक्कादायक बाब म्हणजे तपासात 7 पीडित महिलांचे 120 व्हिडिओ सापडले आहेत. संशयिताने याची कबुली देखील दिली आहे. एवढेच नव्हे तर आरोपीच्या कार्यालयात प्राण्यांचे अवयव आढळून आले आहेत. त्याचा वापर कशासाठी केला जात होता? याचा तपास होणे बाकी आहे.

पोलीस तपासात संशयित आरोपी हा तपासात सहकार्य करत नसल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. ज्या कॅमेराद्वारे ही सर्व व्हिडिओ चित्रित करण्यात आले त्या कॅमेराबाबत देखील माहिती देण्यास संशयित हा टाळाटाळ करत असल्याचे यावेळी तपासी अधिकारी यांनी न्यायालयात सांगितले. या व्हिडिओमधील महिलांची ओळख पटवणे आणि गुन्ह्यात वापरलेली इलेक्ट्रॉनिक उपकरणे यांचा तपासकामी आणखी 7 दिवसांची पोलीस कोठडीची मागणी यावेळी करण्यात आली.दुसरीकडे बचाव पक्षाकडून देखील बाजू मांडण्यात आली. आरोपीचे वकील अरुण दोंदे यांनी युक्तिवाद केला. आरोपी गेल्या पाच दिवसांपासून पोलिसांच्या ताब्यात आहे. सापाची कात मिळून आली आहे, कातडी नाही, असे सांगत हा मोठा गुन्हा नाही आणि जुन्याच कारणावरून पोलीस पुन्हा कोठडी मागत आहेत, असा युक्तिवाद करण्यात आला. दोन्ही बाजू लक्षात घेत न्यायालयाने आरोपी रवींद्र एरंडे याला 4 दिवसांची वाढीव पोलीस कोठडी सुनावली आहे. त्यामुळे आता पोलीस तपासात आणखी काय बाबी समोर येतात? हे बघणे महत्त्वाचे असणार आहे.

# पंजाबसाठी पाऊस ठरला व्हिलन; सामना रद्द झाल्यामुळे नुकसान; तर केकेआरचा मात्र फायदा...

**कोलकाता/वृत्तसंस्था :** कोलकाता नाईट रायडर्स आणि पंजाब किंग्स यांच्यातील आयपीएल 2026 चा सामना पावसामुळे रद्द झाला. केकेआरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. संघाने 3.4 षटकांत दोन गडी गमावून 25 धावा केल्या होत्या. त्याचवेळी, हलक्या पावसामुळे सामना थांबला. मात्र, पावसाचा जोर झपाट्याने वाढल्याने सामना पुन्हा सुरू होऊ शकला नाही.

पाच षटकांच्या सामन्यासाठी कटऑफची वेळ रात्री 11:14 होती. पाऊस थांबला, पण जेव्हा मैदानावरील आच्छादन काढण्यात आले, तेव्हा मैदान खूप ओले होते आणि सीमारेषेजवळ पाणी साचले होते. निर्धारित वेळेत मैदान तयार करता आले नाही, त्यामुळे पंचांनी मैदानाची पाहणी करून दोन्ही कर्णधारांशी चर्चा केली आणि सामना रद्द करण्याचा निर्णय घेतला. केकेआर आणि पंजाब यांना प्रत्येकी एक गुण देण्यात आला.कोलकातामध्ये पावसाची शक्यता लक्षात घेता, नाणेफेक जिंकल्यानंतर अजिंक्य रहाणेने प्रथम फलंदाजी करण्याचा घेतलेला निर्णय आश्चर्यकारक होता. प्रमुख खेळाडूंनीही या निर्णयावर टीका केली. झेवियर बार्टलेटने एकाच षटकात फिन ॲलन आणि कॅमेरॉन ग्रीन यांना बाद केल्याने केकेआरच्या अडचणी आणखी वाढल्या.कोलकाता आणि पंजाब यांच्यातील 5 षटकांच्या सामन्यासाठी कट-ऑफची वेळ रात्री 11:14 वाजता निश्चित करण्यात आली होती.

जर सामना पाच षटकांपर्यंत खेळला गेला असता, तर कोलकाताला फलंदाजीसाठी फक्त आठ चेंडू अधिक मिळाले असते. केकेआर 3.4 षटकांत केवळ 25 धावाच करू शकला. खूप प्रयत्नांनंतरही कोलकाताला जास्तीत जास्त 50 धावांपर्यंतच पोहोचता आले. स्पष्टपणे,



जर सामना पुन्हा सुरू झाला असता तर पंजाबला मोठा फायदा झाला असता.सामना रद्द झाल्यानंतर, कोलकाता नाईट रायडर्सने गुणतालिकेत आपल्या गुणांची सुरुवात केली. या एका गुणासह, केकेआर आठव्या स्थानावर पोहोचला आहे. दरम्यान, पंजाब किंग्सने एका गुणासह आता पाच गुण मिळवले असून ते गुणतालिकेत अव्वल स्थानी आहेत. दुसरीकडे, पंजाब किंग्स या स्पर्धेत आतापर्यंत अपराजित आहे. तर दुसरीकडे, कोलकाताला अजून एकही सामना जिंकता आलेला नाही.

उत्कृष्ट फॉर्ममध्ये असलेल्या आणि विजयाचे प्रबळ दावेदार मानल्या जाणाऱ्या पंजाब किंग्सला पावसामुळे मोठा धक्का बसला. त्यांना केवळ एका गुणावर समाधान मानावे लागले. दुसरीकडे, सलग दोन सामने गमावलेल्या केकेआरसाठी हा सामना जिंकण्याची एक संधी होती, परंतु पावसामुळे सामना रद्द करण्यात आला. त्यांचा सध्याचा फॉर्म पाहता, असे मानले जाते की पावसामुळे केकेआर संभाव्य पराभवापासून वाचले. या सामन्यामुळे केकेआरला या हंगामातील पहिला गुण मिळाला. पंजाब किंग्सने आता तीन सामन्यांमधून एकूण तीन गुण मिळवले आहेत, ज्यात दोन विजय आणि एक रद्द झालेला सामना यांचा समावेश आहे.

## ईशान किशनकडून असं काय चुकलेलं की गर्लफ्रेंड आदितीचा चेहराच उतरला..?

**मुंबई/वृत्तसंस्था :** आयपीएल २०२६ मधील दहावा सामना सनरायजर्स हैदराबाद आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात पार पडला. या सामन्यात लखनौ संघाने आपला पहिला विजय मिळवला. हैदराबाद संघावर लखनौने ५ विकेटने मात केली असून त्यांनेही आपले विजयाचे खाते उघडले आहे. हैदराबादने सामना हरलाच पण १६ व्या ओव्हरमध्ये एक चूक कॅप्टन ईशान किशनकडून झाली त्याचा फटका संघाला बसला. कॅप्टनच्या या चुकीमुळे त्याची गर्लफ्रेंड आदिती हुंडियासुद्धा नाराज झालेली दिसून आली. सोशल मीडियावर आदितीचा एक फोटो तुफान व्हायरल होत असलेला पाहायला मिळत आहे. ईशानकडून असं काय घडलं होतं ज्यामुळे त्याची गर्लफ्रेंड इतकी नाराज झाली.जयदेव उनाडकट हा सामन्याची १६वी ओव्हर टाकत होता, त्यावेळी ओव्हरच्या चौथ्या बॉलवर ईशान किशनकडून विरोधी संघाचा कर्णधार म्हणजेच ऋषभ पंत याला रनआऊट करण्याची संधी गमावतो. त्यावेळी जर पंतला रनआऊट करण्यात तो यशस्वी ठरला असता तर त्याला सामन्याचा निकाल कदाचित बदलू



शकला असता. त्यामुळेच ईशानची गर्लफ्रेंडची नाराज झाली आणि तिचा चेहराच पडलेला दिसला.मोहम्मद शमीने आपल्या क्षमतेची जाणीव राष्ट्रीय निवड समितीस करून देताना अवघ्या नऊ धावांत दोन फलंदाज टिपले. त्याचवेळी स्वतःला सलामीऐवजी तिसऱ्या क्रमांकावर खेळण्याचा निर्णय घेतलेल्या ऋषभपंतने आक्रमकतेस काहीशी मुरड घालत दमदार अर्धशतक केले. त्यामुळे लखनऊ सुपर जायंट्सने आयपीएल टी-२० क्रिकेटमधील पहिला विजय मिळवताना सनरायजर्स हैदराबादला पाचसंघ विजयी होईपर्यंत मैदानात होतो हे सुखावणारे आहे. मोहम्मद शमी, अवेश, राठी या सर्वांनीच सुरेख मारा केला. कोणत्याही सामन्यात निर्दोष कामगिरी होत नसते. व्यवस्थापनाप्रमाणे टीकात्मक असावे त्याचवेळी आपल्या प्रयत्नांचे समाधानही असावे. योजनेची अंमलबजावणी महत्त्वाची असते. ज्याचा शेवट गोड, ते सर्व गोड. माझ्या बॅटने जास्त बोलावे हीच माझी अपेक्षा असते. मी किती मेहनत घेत आहे ते सहकारी आणि व्यवस्थापन जाणते आणि तेच महत्त्वाचे असल्याचं लखनऊ संघाचा कर्णधार ऋषभ पंत म्हणाला. विकेट राखून पराभूत केले.

## आवेश खानच्या अतिउत्साहामुळे लखनौ येणार अडचणीत; शेवटच्या षटकात ड्रामा

**कोलकाता/वृत्तसंस्था :** आयपीएल 2026 मध्ये, लखनौ सुपर जायंट्सने सनरायझर्स हैदराबादला पराभूत करून विजयासह आपल्या खात्याची सुरुवात केली. या विजयामुळे एक मोठा वादही निर्माण झाला. वेगवान गोलंदाज आवेश खानच्या एका कृतीची आता जोरदार चर्चा होत आहे. पंचांनी कोणतीही कारवाई केली नसली तरी, या घटनेमुळे एका नव्या वादाला तोंड फुटले आहे.

लखनौ विरुद्ध हैदराबाद सामन्याच्या शेवटच्या षटकात, जेव्हा ऋषभ पंतने जयदेव उनाडकटच्या गोलंदाजीवर विजयी चौकार मारला, तेव्हा डगआऊटजवळ उभ्या असलेल्या आवेश खानने आपल्या बॅटने चेंडू परत मैदानात मारला. आवेश खानने मारलेला चेंडू पूर्णपणे सीमारेषा ओलांडून गेला नव्हता. या घटनेमुळे सोशल मीडियावर एक चर्चा सुरू झाली, ज्यात काही लोकांच्या मते सनरायझर्स हैदराबादला पेनल्टी रन द्यायला हवा होता. नियमांनुसार, जर मैदानाबाहेरील कोणी खेळात हस्तक्षेप केला, तर चेंडू डेड बॉल घोषित केला जाऊ शकतो. क्रिकेटच्या नियमांनुसार (एमसीसी नियम 20.4.2), जर खेळावर बाह्य हस्तक्षेपामुळे परिणाम होत असेल, तर पंच चेंडू डेड घोषित करू शकतात. या प्रकरणात, कोणत्याही क्षेत्ररक्षकाने चेंडू थांबवण्याचा प्रयत्न केला नाही, त्यामुळे तो अयोग्य खेळ मानला गेला नाही. त्यावेळी सामना बरोबरीत होता आणि लखनौला विजयासाठी फक्त एका धावेची गरज होती. एका अनुभवी पंचांच्या मते, या परिस्थितीत चार धावांचा निर्णय बदलण्यास कोणताही आधार नव्हता. त्यामुळे, पंचांनी खेळ सुरू ठेवला आणि लखनौने सामना जिंकला.

सनरायझर्स हैदराबाद या निर्णयामुळे नाराज आहे. वृत्तानुसार, संघ या प्रकरणी बीसीसीआयकडे तक्रार करू शकतो. जरी नियमांनुसार, सामन्याचा निकाल आता बदलता येत नसला तरी, एसआरएच या संपूर्ण घटनेबाबत अधिकृत तक्रार दाखल करू शकते. गुणतालिकेत, एसआरएच 3 सामन्यांमध्ये 1 विजयासह पाचव्या स्थानावर आहे. तर, लखनौ सुपर जायंट्स 7 व्या स्थानावर आहे. दोन्ही संघांचे प्रत्येकी 2 गुण आहेत, पण हैदराबादचा नेट रन रेट चांगला आहे.



## पंड्या राजस्थानविरुद्ध मॅच खेळणार की नाही ?

**मुंबई/वृत्तसंस्था :** आयपीएल 2026 मध्ये मुंबई इंडियन्सच्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी आली आहे. संघाचा कर्णधार हार्दिक पंड्याच्या तंदुरुस्तीबद्दल सुरू असलेल्या चर्चांदरम्यान, त्याच्या पुनरागमनाची तारीख आता निश्चित झाली आहे. मागील सामन्यात Hardik Pandya खेळता आले नाही. आता यावर प्रशिक्षकाने अपडेट दिली आहे.मुंबई इंडियन्सचे गोलंदाजी प्रशिक्षक पारस म्हाम्ब्रे यांनी 6 एप्रिल रोजी एका पत्रकार परिषदेत सांगितले की, "राजस्थान रॉयल्सविरुद्धच्या सामन्यात खेळण्यासाठी हार्दिक पांड्या पूर्णपणे तंदुरुस्त आहे. हा सामना गुवाहाटीच्या बरसापारा येथील एसीए स्टेडियमवर खेळला जाईल. हार्दिक पांड्या उपलब्ध आहे. त्याने काही नेट सराव सत्रे पूर्ण केली असून तो आता पूर्णपणे ठीक आहे. त्याला कोणतीही दुखापत झाली नव्हती; त्याची प्रकृती ठीक नव्हती, त्यामुळेच तो मागील सामना खेळू शकला नाही."

दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या संघाच्या मागील सामन्यात हार्दिक पांड्या खेळला नव्हता. सामन्यापूर्वी त्याच्या प्रकृतीत बिघाड झाल्याने त्याला विश्रांती देण्यात आली होती. दीपक चहरने संघात त्याची जागा घेतली, ज्याने पहिल्याच षटकात केएल राहुलला बाद करून संघाला शानदार सुरुवात करून दिली. असे असूनही, मुंबई इंडियन्स 163 धावांचा बचाव करू शकले नाही आणि दिल्ली कॅपिटल्सने 11 चेंडू शिल्लक असताना 6 गडी राखून सामना जिंकला.हार्दिकने या मोसमातील पहिल्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध चांगली कामगिरी केली. त्याने नाबाद 18 धावा केल्या आणि 39 धावांत 1 बळीही घेतला. हार्दिकच्या पुनरागमनामुळे मुंबई इंडियन्सला, विशेषतः अष्टपैलू विभागात, संतुलन मिळेल. त्याची उपस्थिती फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्हीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. ही बातमी मुंबई इंडियन्ससाठी दिलासादायक आहे. राजस्थान रॉयल्सविरुद्धच्या महत्त्वपूर्ण सामन्यात हार्दिकच्या पुनरागमनाचा संघाच्या कामगिरीवर मोठा परिणाम होऊ शकतो.

मुंबई इंडियन्सने आयपीएल 2026 मधील आपल्या मोहिमेची सुरुवात विजयाने केली. संघाने पहिल्याच सामन्यात कोलकाता नाइट रायडर्सला 6 गडी राखून पराभूत केले. मात्र, दुसऱ्या सामन्यात मुंबई इंडियन्सला दिल्ली कॅपिटल्सकडून पराभवाला सामोरे जावे लागले.


# पुढच्या वर्षी मी नायक म्हणून या मंचावर असेन', किरण गायकवाडने मित्राला दिलेला शब्द झाला पूर्ण






कोणत्याही कलाकृतीत नकारात्मक किंवा खल भूमिका साकारणारे कलाकार प्रेक्षकांच्या फारसे पसंतीस उत्तरत नाहीत. पण असे काही मोजके कलाकार आहेत, ज्यांच्या पाल्याला नकारात्मक व्यक्तिरेखांमुळेच प्रेक्षकांचं भरभरून प्रेम मिळतं, त्यातलाच एक कलाकार माणजे किरण गायकवाड , ' देवमाणूस ' या लोकप्रिय मालिकेतल्या भूमिकेनं त्याला कौतुकाची थाप मिळवून दिली. किरणला या मालिकेसाठी यंदाचा 'मटा सन्मान' चा 'सर्वोत्कृष्ट अभिनेता' हा पुरस्कारही मिळाला.'लागिर झालं जी' मालिकेतून किरण परापरांत पोहोचाला, नंतर 'देवमाणूस' मालिकेमुळे त्याच्या अभिनयाची दुसरी बानू प्रेक्षकांना बघता आली. मालिकेच्या आधीच्या दोन पर्याप्रमाणे तिसरं पर्वही गाजतंय. माबद्दल किरण सांगतो, 'भूमिका चास्तवदर्शी व्हावी, यासाठी मी वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन निरीक्षण करतो, स्थानिक भाषा आत्मस्वत करतो. राजस्थानमध्ये चित्रीकरण करत असताना तिथली बोलीभाषा, लहेजा, लोकांची देहबोली समजून घेतली.' किरणनं आजवर प्रामुख्यानं नकारात्मक भूमिका साकारल्य खलनायक म्हणून त्याला ओळखू लागले. पण 'नायक' माणून स्वतःला सिद्ध करण्याची त्याची इच्छा होती. ती इच्छा 'मटा सन्मान' मध्ये पूर्ण झाल्याचं तो सांगतो. 'साधारण वर्षभरापूर्वीच्या सन्मान सोहळ्यात मी मजेत एका सहकारी मित्राला म्हटलं होतं की, 'पुढच्या वर्षों मी नायक म्हणून या मंचावर असेन. माझं हे स्वप्न यावर्षी प्रत्यक्षात उत्तरलं.'मालिकेत कठीण प्रसंगांचं चित्रीकरण करताना सतत तणाव, राय, संघर्ष पातून जावं लागत असल्याचा अनुभव तो मांडतो. 'काही प्रसंग इतके भडक असतात, की चित्रीकरण संपल्यानंतरही त्या भावना मनातून जात नाहीत, मालिकेत दाखवली जाणारी हिंसा अनेकदा नकोशी वाटते. ही नकारात्मकता दूर करण्यासाठी मेडिटेशन करणं, सुट्टी मिळेल तेव्हा निसर्गाच्या सान्निध्यात फिरायला जाणं या गोष्टी मी आवर्जून करतो. विशिष्ट भूमिका लोकप्रिय झाली, की कलाकाराला तशाच प्रकारच्या कामांची विचारणा होते. हा अनुभव किरणलाही झाला आहे. त्याबद्दल तो म्हणाला, 'मी सकारात्मक भूमिकासुद्धा करू शकतो, पण तशा संधी येत नाहीत, याची खंत वाटते, त्यामुळे मी स्वतःचा सिनेमा लिहिला असून स्वतःच त्याचं दिग्दर्शनही केलंय. पोस्ट प्रोडक्शनमध्ये असलेला 'एफआयआर नं. ४६९' हा चित्रपट पावर्षी प्रदर्शित होईल. माझी तळमळ, खदखद आहे, ती आता मी लेखणीतून उतरवली आहे.किरणला यंदा मालिकेसाठी 'मटा सन्मान चा सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला. त्याबद्दल तो महणाला, "देवमाणूस' मधली माशी भूमिका नकारात्मक असल्यानं माझ्याकडे नेहमी खलनायक म्हणूनच बघितलं गेलं, पेदा 'मटा सन्मान' मधील मानांकनात अनेक अनुभवी अभिनेत्यांसोबत माझं नावं पाहून समाधान वाटलं होतं. सोहळ्यात माझं नाव घोषित केलं तेवहा मनापासून आनंद झाला. 'मटा'नं 'नायक' म्हणून सन्मान दिला.

## 'मी तुला 50 लाख देईन' चंद्रिका दीक्षितकडे व्यावसायिकाची मागणी, Vada Pav Girl ने सांगितला तो प्रसंग





वडा पाव गर्ल म्हणून ओळखली जाणारी चंद्रिका दीक्षित सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. काही दिवसांपूर्वीच चंद्रिकानं तिच्या पतीवर फसवणुकीचा आरोप केला होता. यानंतर तिचा पती युगमनं अनेक खुलासे केले आहेत. दरम्यान, चंद्रिकानं आणखी एक खुलासा केला आहे. मात्र, हा खुलासा तिच्या पतीशी संबंधित नसून तिच्या कामाशी संबंधित आहे. चंद्रिकाचा दावा आहे की, तिला कॉम्प्रोमाईज करण्यासाठी ऑफर देण्यात आलेली, या बदल्यात त्या व्यक्तीनं तिला मोठी रक्कम देऊ केली होती.सिद्धार्थ कन्ननसोबत नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत चंद्रिका दीक्षित म्हणाली, 'मी त्याला एक व्यवस्थित ईमेल पाठवला होता. तो एक चांगला व्यावसायिक होता. मी तुम्हाला त्या ईमेलचा स्क्रीनशॉटसुद्धा देईन. तो मला एक रिसॉर्ट देत होता. तो म्हणाला, 'कंडीशन आणि सिच्युएषन तुझी आहे, जागा माझी आहे. चंद्रिका, मी तुला ५० लाख रुपये देतो, बाकीचं तू मला सांग.' चंद्रिकानं पुढे सांगितलं की, 'ही ऑफर तिला व्यावसायिकरित्या ईमेलद्वारे आली होती.' सैफीने हे देखील उघड केलं की, काही दिग्दर्शक आणि निर्मात्यांनी चंद्रिकाला फोन करून कॉम्प्रोमाईजचे प्रस्ताव दिले होते. कोणीतरी तिला दुबईलाही आमंत्रित करत होतं.याव्यतिरिक्त, चंद्रिका दीक्षितने पुढे स्पष्ट केलं की, ज्या व्यक्तीनं तिला ही ऑफर दिली होती, त्यानं तिला सल्ला दिला की, जर तिला पुढे जायचं असेल, तर तिला कॉम्प्रोमाईज करावं लागेल. अन्यथा, ती तिच्या करिअरमध्ये प्रगती करू शकणार नाही. 'वडा पाव गर्ल' पुढे म्हणाली, 'ही सद्यस्थिती आहे आणि यामुळे बराच गोंधळ उडाला आहे.'पुढे चंद्रिका म्हणाली, 'लोक म्हणतात की, ते तुम्हाला अशा प्रकारे पुढे जाऊ देणार नाहीत, हाच मुद्दा आहे. ब्रँड शूटमध्येही असं घडतं. लोक म्हणतात की, तुम्हाला किमान एकदा तरी कॉम्प्रोमाईज करावं लागेल. ते म्हणतात, 'सांगा तुमच्याकडे किती पैसे आहेत. तुम्ही अडीच वर्षांच्या मुलीला सोडणार नाही,.

## ओव्हरॲक्टिंग म्हणणाऱ्यांना कारंडेचं उत्तर



बिग बॉस मराठीचं सहावं पर्व आता लवकरच संपणार आहे. काही दिवसांपूर्वी बिग बॉसच्या घरात फॅमिली वीक झाला. यामध्ये सागर कारंडेनं कुटुंबाला पाहताच क्षणी ज्या पद्धतीनं रिॲक्ट केलं, त्यावरून अभिनेत्याला ट्रोल करण्यात आलेलं. काही नेटकऱ्यांनी ओव्हरॲक्टिंग असंही म्हटलेलं. अशातच आता बिग बॉसच्या बाहेर येताच सागरनं यावर मौन सोडलं असून त्यावर प्रतिक्रिया दिली आहे.बिग बॉस मराठीमधून सागर कारंडे एलिमिनेट झाला. राजश्री मराठीला नुकत्याच दिलेल्या मुलाखतीमध्ये सागरला फॅमिली वीकच्या त्याच्या रिॲक्शनबद्दल विचारण्यात आलं. त्यावर सागर कारंडे म्हणाला की, 'ठरवून कसं रिॲक्ट होणार? माझी फॅमिली आल्यावर मी असं रिॲक्ट होईल. माझी फॅमिली स्टोअर रूममधून येणार हे कुठे माहित होतं. सगळ्यांचे कुटुंबीय मुख्य दरवाजातून आले. मी दरवाजासमोर उभा होतो, मला काय माहित आतमध्ये आहेत ते. बिग बॉसने सांगितलं माईकची बॅटरी चेंज करा. म्हणून मी गेलो ना!'आता प्रत्येकाची व्यक्त होण्याची पद्धत वेगळी आहे. लोकांना का असं वाटतं, याने असं रिॲक्ट नाही व्हायचं. तुम्ही असता तर वेगळ्या पद्धतीने व्यक्त झाला असता. मी आहे म्हणून या पद्धतीने व्यक्त झालो, हा सागर कारंडे. आत प्रत्येकाचं ऐकत बसलो तर...असं नाही होत ना! होतं यार. तीन महिन्यांनी जर कुटुंबाचा चेहरा बघताय. आपल्या कुटुंबियांना आपण टीव्हीवर दिसतोय. पण, आम्हाला काहीच सोर्स नाहीये, घरचे कसे आहेत. ते कसे दिसतात इथून सुरुवात झालेली. मी माझ्या पद्धतीने रिॲक्ट झालेलो.' असं सागरने शेवटी सांगितलं.दरम्यान, बिग बॉस मराठीमध्ये आता दीपाली सय्यद, राखी सावंत, रेवा कौरासे, तन्वी कोलते, विशाल कोटियन, राकेश बापट, अनुश्री माने हे स्पर्धक उरले असून आता बिग बॉसच्या फिनाले पर्यंत कोण पोहोचतं आणि बिग बॉस मराठीच्या सहाव्या पर्वाच्या ट्रॉफीवर कोणाचं नाव कोरलं जातं, याकडे प्रेक्षकांचं लक्ष वेधलं आहे.

## प्रेम सर्वस्व नाही ' थलापती विजयसोबत डेटिंगच्या चर्चेदरम्यान त्रिशा कृष्णान ची क्रिप्टिक पोस्ट



थलापती विजयसोबतच्या अफेअरच्या चर्चेदरम्यान, अभिनेत्री त्रिशा कृष्णननं प्रेमाबद्दल एक गूढ पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमुळे अभिनेत्रीच्या नात्याबद्दलच्या चर्चांना हवा मिळाली. त्रिशाने एक व्हिडिओ आणि एक सुविचार शेअर केला आहे, ज्यात शांत राहण्यावर आणि शांतता निवडण्यावर भर दिला आहे. व्हिडिओमध्ये लिहिलं आहे की, 'मी माझ्या आयुष्याच्या अशा टप्प्यावर आहे जिथे मी आता वाद घालत नाही.' त्रिशा कृष्णनच्या व्हिडिओमध्ये पुढे लिहिलं आहे, 'जर तुम्ही म्हणालात की हत्ती उडू शकतो, तर तुम्ही अगदी बरोबर आहात. माझा त्यावर विश्वास आहे म्हणून नाही, तर मला आता तुम्हाला पटवून देण्याची पर्वा नाही. मी एक महत्त्वाची गोष्ट शिकले आहे, बरोबर असण्यापेक्षा शांत राहणं अधिक योग्य आहे. स्पष्टीकरण देण्यापेक्षा शांत राहणं सोपं आहे, आणि प्रत्येकजण तुमच्या वेळेसाठी पात्र नसतो.'पुढे लिहिलं आहे, 'काही वाद हे गैरसमज नसतात, तर ते स्वतःला थकवून घेण्याचं आमंत्रण असतं. म्हणून मी ते नाकारते, हसते आणि माझा संयम बाळगते. कोणताही गोंधळ नाही, कोणतीही प्रतिक्रिया नाही, फक्त शांतता' तिनं आणखी एक सुविचार शेअर केला, ज्यात लिहिले होतं, 'प्रेम सर्वस्व नाही, पण प्रेमाशिवाय सर्व काही निरर्थक आहे.' तिने हे एक सत्य असल्याचं म्हटलं. त्रिशा कृष्णन आणि थलापती विजय यांचं नाव यापूर्वीही अनेकदा एकमेकांशी जोडले गेलं आहे. अलीकडेच, विजयची पत्नी, संगीता सोरनालिंगमने, एका सह-अभिनेत्रीसोबत त्याचे संबंध असल्याचा आरोप करत घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला. विजय किंवा त्रिशा या दोघांनीही या दाव्यांवर कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही, परंतु या अफवा सुरूच आहेत.त्रिशा आणि विजय यांनी 'घिल्ली' (२००४), 'तिरुपाची' (२००५), 'आथी' (२००६) आणि 'कुरुवी' (२००८) यांसारख्या अनेक तमिळ चित्रपटांमध्ये एकत्र काम केलं आहे. त्यांची जोडी प्रेक्षकांना खूप आवडली, ज्यामुळे त्यांच्या अफेअरच्या अफवा पसरल्या. त्यावेळी, दोन्ही कलाकारांनी या अफवा फेटाळून लावल्या होत्या आणि ते फक्त चांगले मित्र असल्याचं सांगितलं होतं. अनेक वर्षांनंतर, त्यांनी 'लिओ' (२०२३) मध्ये एकत्र काम केलं.

# लोणार येथे आज भव्य योग महोत्सव

## प्रशासनाने यशस्वी आयोजनासाठी सज्ज राहावे -केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव

**जनसंचलन/ खामगाव**

जगप्रसिद्ध लोणार सरोवर परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज उद्यान येथे उद्या, ७ एप्रिल रोजी भव्य ङ्कयोग महोत्सवाफ्वे आयोजन करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर ङ्ककाउंटडाऊनफ उपक्रमाचा भाग म्हणून साजऱ्या होणाऱ्या या महोत्सवात सर्व शासकीय यंत्रणांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले. महोत्सवाच्या नियोजनासंदर्भात लोणार येथे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी आयुष विभागाच्या सहसचिव मोनालिसा दास, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, मुरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थान चे संचालक डॉ. काशिनाथ समघंडी, कार्यक्रम अधिकारी डॉ. ईश्वर आचार्य यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय योग दिनाला अवघे ७५ दिवस शिल्लक असताना योगाचा व्यापक प्रचार-प्रसार व्हावा, या उद्देशाने आयुष मंत्रालयाच्या वतीने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात ७ हजारांहून अधिक योगसाधक सहभागी होणार असल्याची माहिती देताना प्रतापराव जाधव यांनी योग ही भारतीय संस्कृतीतील प्राचीन परंपरा असून शरीर, मन आणि आत्म्याचा समतोल साधणारी जीवनशैली असल्याचे सांगितले. महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यक्रमाच्या ठिकाणी पार्किंग व्यवस्था, स्वच्छता, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, सुरक्षा व्यवस्था तसेच गर्दी नियंत्रण याबाबत सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. तसेच शासकीय अधिकारी, कर्मचारी, शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग सुनिश्चित करण्याचे आवाहन करण्यात आले. या योग महोत्सवाच्या माध्यमातून लोणार सरोवर या पर्यटन स्थळाला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळण्यास मदत होणार असून, एकाच वेळी सर्वाधिक लोकांनी ङ्कत्रिकोणासनफ करण्याचा विक्रम नोंदवत एशियन बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. या उपक्रमात इंटरनॅशनल नॅचरोपॅथी ऑर्गनायझेशन, योग विद्या गुरुकुल, क्रीडा भारती, पतंजली योग संस्थान, आर्ट ऑफ लिव्हिंग, महिला बचत गट तसेच शाळकरी विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

# जळगाव जामोद तालुक्यातील ग्रामपंचायत पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

**जनसंचलन/ बुलढाणा**

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जळगाव जामोद तालुक्यातील रिक्त असलेल्या सरपंच आणि सदस्य पदांच्या पोटनिवडणुकीचा अधिकृत कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून २८ एप्रिल २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. यामध्ये भिंगारा ग्रामपंचायतीच्या सरपंच पदासह तालुक्यातील कुंवरदेव, मडाखेड खुर्द, मांडवा, माहुली, गोळेगाव खुर्द, मडाखेड बु., निंभोरा बु. आणि जामोद या ग्रामपंचायतींमधील रिक्त जागांसाठी ही निवडणूक होत आहे. ७ एप्रिल ते १३ एप्रिल या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत इच्छुक उमेदवारांना आपले नामनिर्देशन पत्र सादर करता येतील. त्यानंतर १५ एप्रिल रोजी अर्जांची छाननी केली जाईल आणि १७ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत असेल. २८ एप्रिल रोजी सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० या वेळेत मतदान होईल आणि २९ एप्रिल रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर करण्यात येईल. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्याने संबंधित ग्रामपंचायत क्षेत्रात आचारसंहिता लागू करण्यात आली असून, तहसीलदार पवन पाटील यांनी सर्व नागरिकांनी या निवडणूक प्रक्रियेची नोंद घ्यावी असे आवाहन केले आहे.

आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा
बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणूक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार





सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
***
दैनिक निडर निर्भीड
जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

# प्रहारची धार अन् प्रशासनाची झाली हार!

## धाड येथील आठवडी बाजारासाठी महामार्गावरच थाटली दुकाने; भरचौकात ठोकला उपोषण मंडप

**जनसंचलन/धाड**

मागील २८ वर्षांपासून दुर्लक्षित असलेल्या धाड येथील आठवडी बाजाराच्या प्रश्नावर आज प्रहार जनशक्ती पक्षाने छेडलेल्या आक्रमक आंदोलनासमोर अखेर जिल्हा प्रशासनाला झुकावे लागले. ऐन उन्हाळ्यात प्रहारच्या कार्यकर्त्यांनी उपोषण सुरू करताच आणि व्यापाऱ्यांनी थेट छत्रपती संभाजीनगर महामार्गावर दुकाने थाटल्याने प्रशासनाची चांगलीच भंबेरी उडाली. अखेर तहसीलदार आणि सहाय्यक बिडीओनी लेखी आश्वासन दिल्यानंतर सायंकाळी हे आंदोलन मागे घेण्यात आले.



१९९६ पासून धाड येथील आठवडी बाजार वाऱ्यावर आहे. ज्या जागेवर बाजार भरतो, त्या जागेचा वापर आठवडाभर नागरिक सार्वजनिक शौचालय म्हणून करतात. अत्यंत घाणीच्या साम्राज्यात आणि दुर्गंधीत बाजार भरत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला होता. कायमस्वरूपी जागा, निर्जंतुकीकरण आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था या मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाने बुलढाणा तहसीलदार आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा केला होता. मात्र, प्रशासनाच्या ढिम्म कारभारामुळे आज संपाचा आणि संघर्षाचा पवित्रा घेण्यात आला. वैभवराजे मोहिते यांच्या नेतृत्वाखाली प्रचाराचे उप तालुका प्रमुख गणेश जाधव, चिखली तालुका प्रमुख सुनील वाघ, विभाग प्रमुख सोनू वाघ, शरप्रमुख सचिन नेमाने, युवा शहर प्रमुख अजय शिंदे, दिलीप उबाळे, नीलेश चिंचोले, शाम टाकसाळ, निलेश गुरव, दिलीप ठाकरे, ऋषी वाघ, राजू शिंदे, पवन बामदळे, वैभव कोप्पे, वैभव माळोदे, प्रवीण गुजर, विनोद ठाकरे, आरोग्य सेलचे तालुकाप्रमुख अनंत उबाळे, अरविंद गुजर, विष्णू घाडगे, स्वप्नील नेमाने, नितीन इंगळे, संतोष पवार, सागर गायकवाड, ज्ञानेश्वर माळोदे, उमेश घाडगे, संदीप खेडकर, विशाल मोरे, आशिष तोटे, शिवराज बोराडे, शुभम कुटे, गोपाल बोराडे, राजू ढोले , भिका केळोदे, अनिल तोटे, गजानन राऊत, रामू ठाकरे, गणेश ताठे, रामेश्वर ताठे, राजू भिंगारे, विठ्ठल शिंदे, वैभव सोनूने, विकास दांडगे, नीलेश मुठ्ठे, विश्वजित दांडगे, संजय उबाळे, नारायण नेमाने, विठ्ठल खेडकर, समाधान सरोदे, रमेश उबाळे, विनोद खेडकर, गजानन जाधव यांच्यासह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आज ६ एप्रिल रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवाजी महाराज स्मारकावर शिवरायांच्या पुतळ्याचे पूजन करून सकाळी दहा वाजता उपोषणाला सुरुवात केली. आंदोलनाचे गांभीर्य ओळखून व्यापाऱ्यांनीही आक्रमक भूमिका घेतली. व्यापाऱ्यांनी आपली दुकाने चक्क धाड ते छत्रपती संभाजीनगर महामार्गावर लावली. यामुळे वाहतुकीचा खोळंबा झाला आणि प्रशासकीय यंत्रणेत खळबळ माजली. आंदोलनाची तीव्रता आणि नागरिकांचा वाढता पाठिंबा पाहून बुलढाणा पंचायत समितीचे सहाय्यक बी.डी.ओ. ढोरे, विस्तार अधिकारी अरविंद टेकाळे आणि सरपंच सावित्रीबाई बोर्डे यांनी तातडीने उपोषणस्थळी धाव घेतली. त्यांनी जागेचा प्रस्ताव तातडीने तयार करण्याचे मान्य केले. तसेच जागा उपलब्ध होईपर्यंत सध्याची बाजाराची जागेचे बाजाराच्या अगोदरच्या दिवशी निर्जंतुकीकरण करण्यात येईल, तत्काळ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येईल असे लेखी आश्वासन दिले. त्यानंतर तहसीलदार विठ्ठल कुमरे यांनीही स्वतः उपोषण मंडपाला भेट देऊन ग्रामपंचायतीकडून प्रस्ताव प्राप्त होताच जागा उपलब्ध करून दिली जाईल, असे लेखी आश्वासन दिले. आम्ही रडणारे नाही, तर लढणारे आहोत. जोपर्यंत आमच्या हक्काची जागा मिळत नाही आणि येथील घाणीचे साम्राज्य संपत नाही, तोपर्यंत आमचा लढा सुरूच राहील. आज केवळ आश्वासनावर थांबलो आहोत, कृती न झाल्यास पुढचा संघर्ष अधिक तीव्र असेल, अशी प्रतिक्रिया प्रहार जनशक्ती पक्षाचे वैभवराजे मोहिते यांनी दिली.

# डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी स्वीकारला बुलढाणा जिल्हाधिकारी पदाचा पदभार



**जनसंचलन/ बुलढाणा**

डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी आज बुलढाणा जिल्ह्याचे नूतन जिल्हाधिकारी म्हणून अधिकृतपणे पदभार स्वीकारला. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात डॉ. देवरे यांचे स्वागत करून प्रशासकीय सूत्रे त्यांच्याकडे सुपूर्द केली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी, विविध विभागांचे उपजिल्हाधिकारी आणि तहसीलदार उपस्थित होते. पदभार स्वीकारल्यानंतर डॉ. देवरे यांनी जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून जिल्ह्याच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला. शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि प्रशासकीय कामात गतीमानता आणण्याला आपले प्राधान्य असेल, असे त्यांनी यावेळी नमूद केले.

## लोणार येथे आज भव्य योग महोत्सव; प्रशासनाने यशस्वी आयोजनासाठी सज्ज राहावे - केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव

**जनसंचलन/बुलढाणा**



जगप्रसिद्ध लोणार सरोवर परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज उद्यान येथे उद्या, ७ एप्रिल रोजी भव्य ङ्गयोग महोत्सवाफ्चे आयोजन करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर काउंटडाऊनफ उपक्रमाचा भाग म्हणून साजऱ्या होणाऱ्या या महोत्सवात सर्व शासकीय यंत्रणांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले. महोत्सवाच्या नियोजनासंदर्भात लोणार येथे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी आयुष विभागाच्या सहसचिव मोनालिसा दास, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, मुरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थान चे संचालक डॉ. काशिनाथ समघंडी, कार्यक्रम अधिकारी डॉ. ईश्वर आचार्य यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय योग दिनाला अवघे ७५ दिवस शिल्लक असताना योगाचा व्यापक प्रचार-प्रसार व्हावा, या उद्देशाने आयुष मंत्रालयाच्या वतीने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात ७ हजारांहून अधिक योगसाधक सहभागी होणार असल्याची माहिती देताना प्रतापराव जाधव यांनी योग ही भारतीय संस्कृतीतील प्राचीन परंपरा असून शरीर, मन आणि आत्म्याचा समतोल साधणारी जीवनशैली असल्याचे सांगितले. महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यक्रमाच्या ठिकाणी पार्किंग व्यवस्था, स्वच्छता, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, सुरक्षा व्यवस्था तसेच गर्दी नियंत्रण याबाबत सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. तसेच शासकीय अधिकारी, कर्मचारी, शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग सुनिश्चित करण्याचे आवाहन करण्यात आले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८